***Dr. Kirit Somaiya***
***B.Com, FCA, Ph.D.***
*Ex-Member of Parliament*
*Convenor, BJP Investors' Cell*
*Member, National Executive*

**Bharatiya Janata Party**
**भारतीय जनता पार्टी**

# मुंबईने २००६-०७ या अर्थिक वर्षात ९३,१७० कोटी रुपये करांपोटी केंद्राकडे भरले

**- डॉ. किरीट सोमैया**

जुलै ०५, २००७

मुंबई महानगरीने २००६-०७ या अर्थिक वर्षात करांपोटी केंद्र सरकारकडे तब्बल ९३,१७० कोटी रुपयांचा भरणा केला आहे. चालू अर्थिक वर्षात, म्हणजेच २००७-०८ मध्ये तर हा आकडा १ लाख कोटी रुपयांचा टप्पा ओलांडणार आहे, अशी माहिती भारतीय जनता पार्टीचे नेते आणि माजी खासदार डॉ. किरीट सोमैया यांनी दिली.

गेल्या अवघ्या दोन वर्षांत मुंबईतील करसंकलनाची रक्कम दुपटीहून अधिक झाली आहे. सन २००४-०५ मध्ये मुंबईकरांनी ५०,९७९कोटी रुपये कररूपाने केंद्राला दिले होते. या करांमध्ये प्राप्तिकर, कंपनीकर (कॉर्पोरेट टॅक्स), उत्पादनशुल्क, सेवाकर व अन्य करांचा समावेश आहे.

सेवाकरामध्ये तर गेल्या दोन वर्षांत तिपटीहून अधिक ( ३,९७९ कोटी रुपयांहून १२,१३७कोटी रुपये) वाढ झाली आहे,

**मुंबईमधून होणारी करवसुली**

आकडे कोटी रुपयांत

| | २००४-०५ | २००५-०६ | २००६-०७ |
|---|---|---|---|
| कंपनीकर | ३०४१३ | ३४००६ | ४९५५० |
| प्राप्तिकर | ११५७५ | १४०२७ | १९८१४ |
| सिक्युरिटी ट्रॅन्सॅक्शनकर | ५८३ | २४९४ | ४६३२ |
| एफबीटी | १६०७ | १७४७ | |
| अन्य प्रत्यक्षकर | ९२ | २४१ | ३७२ |
| केंद्रीय उत्पादनशुल्क | ४३३६ | ३८५२ | ४९२३ |
| सेवाकर | ३९७९ | ७१०२ | १२१३२ |
| एकूण | ५०९७८ | ६३३२९ | ९३१७० |

विशेष म्हणजे करवसुली एवढ्या मोठ्या प्रमाणावर वाढलेली असूनही केंद्र सरकारने मुंबईच्या मदतीसाठी गेल्या दोन वर्षांत एक नवा पैसाही दिलेला नाही. हे मुंबईचे शोषणच नव्हे काय, असा जळजळीत सवाल डॉ. किरीट सोमैया यांनी केला. या पार्श्वभूमीवर सध्या केंद्रात आणि राज्यात, दोन्हीकडे काँग्रेसच्या हाती सत्ता असताना काँग्रेस नेते काय करीत आहेत, असा प्रश्न भाजपतर्फे करण्यात येत आहे.

**प्रसिद्धी सचिव**

**BJP Office :** ● 11, Ashoka Road, New Delhi 110 001

➔**Please Reply :** 9C, Neelam Nagar, Mulund (E), Mumbai 400 081- Tel21639649/21634152/
(M)9869220027 ● Email: kirit@vsnl.in, kiritsomaiya@gmail.com Website : www.kiritsomaiya.com